# श्रद्धा आणि भीती

एके दिवशी श्रद्धा आणि भीती यांची भेट झाली.
भीती म्हणाली, "मी तुझ्यापेक्षा अधिक शक्तिशाली आहे, कारण माझ्यामुळे कोणालाही मोकळेपणाने जगता येत नाही. मी लोकांची कामे थांबवते, जरी माझे अस्तित्व फार काळ टिकणारे नसले तरीही."
श्रद्धेने उत्तर दिले, "तुझे अस्तित्व केवळ 'ठराविक समजेपर्यंत' असते, पण मी त्या समजुतीच्याही पलीकडे आहे. मी उत्साहाने आशेचे दार उघडते; यामुळे मनाची शक्ती वाढते."

**तात्पर्य:**

श्रद्धेवर विश्वास ठेवा. श्रद्धेवर कधीही शंका घेऊ नका. भीती ही शंकेमुळे निर्माण होते.जेव्हा आपण श्रद्धेवर शंका घेतो, तेव्हाच भीती निर्माण होते. श्रद्धा आणि भीती एकत्र राहू शकत नाहीत. ज्या प्रकारे एक चमचा दही, पातेलेभर दुधाला नासवते, त्या प्रमाणे १% शंका ९९% श्रध्देला भीतीत बदलवते.